ePaper

चंद्राबाबूंना हवं लोकसभा अध्यक्षपद, तर नितीश कुमारांना हवी ३ मंत्रिपदं



|| वर्ष - 7 । अंक - 338 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 7 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत

- रक्ताचा नमुना आईचाच!
- जसप्रीत बुमराहने रचला इतिहास
- प्रार्थना बेहेरेने मागितली माफी
- पण सरकार टीकणार नाही!


## पक्षाला आलेले अपयश हे माझ्यामुळे: अजित पवार

# ‘आम्ही कमी पडलो म्हणून हारलो’!

### अजित पवार यांची माध्यमांसमोर पहिली प्रतिक्रिया



। मुंबई । महाईन्यूज

**“मला बाकी लोकांच्याबद्दल काही बोलायचं नाही. पण बारामतीचादेखील जो कौल आहे तो कौल, जो काही निकाल लागला आहे त्याबद्दल मी स्वतः आश्चर्य झालेलो आहे. मलाही समजत नाही की, गेल्या अनेक वर्ष मी तिथे काम करतोय. बारामतीकरांनी मला नेहमी पाठिंबा दिलेला होता. यावेळेस कशामुळे त्यांनी मला पाठिंबा दिला नाही, बाकीचे मतदारसंघ तर बाजूलाच राहुद्या”, अशी खंत अजित पवार यांनी व्यक्त केली.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व आमदारांसोबत बैठक घेतल्यानंतर प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली. या निमित्ताने अजित पवार लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पहिल्यांदाच माध्यमांसमोर आले. यावेळी त्यांनी लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या पराभवावर प्रतिक्रिया दिली. “एनडीएला बहुमताचा आकडा गाठता आला आहे. जो काही निकाल लागला आहे त्यामध्ये आम्ही काही फार समाधानी नाहीत. या निकालाची सर्वस्व जबाबदारी माझी आहे हे मी मान्य करतो. कारण जनतेने दिलेला कौल आहे. आम्ही जनतेचा विश्वास संपादन करण्यात कुठेतरी कमी पडलो हे आम्हाला मान्यच करावं लागेल. जे काही अपयश आलं आहे त्याची जबाबदारी मी स्वतः स्वीकारली आहे”, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली.

“आम्ही सर्वांना बोलवण्यामागील कारण म्हणजे आज सकाळी काही प्रमुख नेत्यांची बैठक घेतली होती. या बैठकीत सर्व मंत्री होते, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, रामराजे निंबाळकर असे आम्ही सर्वजण बसलो होतो. आम्ही आज संध्याकाळी आमच्या सर्व आमदारांना एकत्र बोलावलेलं होतं. त्यातील काही जण त्यांच्या अडचणींमुळे येऊ शकले नाहीत. बाबा आत्रामांचं ऑपरेशन झालं आहे. कुणाच्या काही दुखद घटना घडल्या आहेत, अशा काही कारणास्तव ते येऊ शकले नाहीत. पण जे येऊ शकले नाहीत त्यांनी सुद्धा फोनवर संपर्क साधला”, असं अजित पवार यांनी सांगितलं.

“शेवटी जनतेचा कौल असतो, तो कौल लोकशाहीत स्वीकारायचाच असतो. पुन्हा नाउमेद न होता लोकांसमोर जायचं असतं. मी कार्यकर्त्यांना नेहमीच सांगतो की, यश मिळालं म्हणून हुरळून जायचं नसतं तर किंवा अपयश मिळालं म्हणून खचून जायचं नसतं. पुन्हा नव्या उमेदीने सगळ्यांनी काही महिन्यांनी येणाऱ्या निवडणुकीत सामोरे जाण्याचा निर्णय घेतला आहे. आमची साहजिकच महायुती आहे, या महायुतीत जे प्रमुख आहेत, त्यांच्याशी चर्चा करुन जागावाटप करु”, असं अजित पवारांनी सांगितलं.

**पराभव झाला तरी चालेल पण...**

अजित पवार गटाच्या आमदारांनी बैठकीत आपल्या नेत्याला पक्षाला सोडणार नाही, अशी ग्वाही दिली आहे. पराभव झाला तरी चालेल पण अजित दादांची साथ सोडणार नाही, असा निर्धार बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व आमदारांनी एकमताने केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अस्वस्थता असल्याची चर्चा आहे. लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीला केवळ एका जागेवर यश मिळालं आहे. तसेच महायुती या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात फेल ठरली आहे. त्यामुळे अजित पवार गटातील आमदारांमध्ये अस्वस्थता असल्याचं वृत्त आहे. त्यामागील कारणही अगदी तसंच आहे. लोकसभा निवडणुकांनंतर आता महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीचं बिगूल वाजणार आहे. लोकसभा निवडणुकीतून महाराष्ट्राच्या जनतेचा मूड लक्षात आला आहे. त्यामुळे अजित पवार गटाचे आमदार शरद पवार गटाची साथ धरणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## ‘बारामतीच्या निकाल पाहून मी स्वत: आश्चर्यचकीत’

“जे सातत्याने बातम्या देण्याचा प्रयत्न मीडियामध्ये पाहतोय, आमचे कुणीतरी विरोधक म्हणत आहेत की, यांनी संपर्क साधला, त्यांनी संपर्क साधला. असं काही झालेलं नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व आमदार आमच्यासोबत आहेत. हे अतिशय स्पष्ट चित्र आज पाहायला मिळालं आहे. अर्थात विरोधकांनी काय बोलावं हा त्यांचा अधिकार आहे. मला बाकी लोकांच्याबद्दल काही बोलायचं नाही. पण बारामतीचादेखील जो कौल आहे तो कौल, जो काही निकाल लागला आहे त्याबद्दल मी स्वतः आश्चर्य झालेलो आहे. मलाही समजत नाही की, गेल्या अनेक वर्ष मी तिथे काम करतोय. बारामतीकरांनी मला नेहमी पाठिंबा दिलेला होता. यावेळेस कशामुळे त्यांनी मला पाठिंबा दिला नाही, बाकीचे मतदारसंघ तर बाजूलाच राहुद्या”, असं अजित पवार म्हणाले.

## अजित पवारांनी सांगितलं पराभवामागील कारण

“मागे लोकसभेच्या चर्चावेळी कुठे आम्ही कमी पडलो, हे समजलं. यावेळेस आम्हाला जाणवलं की, मुस्लिम समाज आमच्यापासून दूर गेलेला होता. विरोधकांनी संविधान बदलणार असल्याचा प्रचार केला. त्या प्रचाराला मागासवर्गीय समाजाने थोडा-बहुत प्रतिसाद दिला. मागासवर्गीय समाजात तसा प्रचार बिंबवण्यात विरोधक यशस्वी झाले. तसेच आरक्षणाचा मुद्दाही कारणीभूत ठरला. मराठवाड्यात संभाजीनगरची जागा सोडली तर एकही जागा महायुतीत येऊ शकली नाही. अशा अनेक गोष्टी निकाल पाहिल्यानंतर आणि आमदारांशी चर्चा केल्यानंतर पुढे आल्या”, असं अजित पवार म्हणाले. “यातून आम्हाला जी नोंद घ्यायला पाहिजे, ज्यातून आम्हाला काही निर्णय घ्यावे लागतील ते घेण्यासाठी आमची पुढची वाट असेल. या दोन-तीन गोष्टींचा फटका आम्हाला बसला आहे. जनता जनार्धन असते. जनतेने दिलेला विनम्र कौल आम्ही स्वीकारलेला आहे. त्यांच्या आमच्याबद्दलचा जो विश्वास कमी झालेला आहे तो विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी आम्ही जीवाचं रान करु”, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली.

## पुणे मेट्रोच्या रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाला प्रवाशांचा प्रतिसाद

# पुणे मेट्रो सुसाट!

### स्वारगेटपर्यंत धावण्याचा मुहूर्त अखेर ठरला, विस्तारित मार्गामुळे मेट्रोच्या प्रवासी संख्येत वाढ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे मेट्रोच्या रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या विस्तारित मार्गामुळे मेट्रोच्या प्रवासी संख्येत वाढ होत आहे. जानेवारीच्या तुलनेत प्रवासी संख्येत मे महिन्यात सुमारे ९ लाखांची वाढ झाली आहे. यामुळे मेट्रोची सरासरी दैनंदिन प्रवासी संख्या आता ९० हजारांवर पोहोचली आहे. दरम्यान, स्वारगेटपर्यंत मेट्रो धावण्यासाठी सप्टेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.**



रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे ६ मार्चला केले. तेव्हापासून मेट्रोच्या प्रवासी संख्येत वाढ होत आहे. विस्तारित मार्ग सुरू होण्याआधी मेट्रोची प्रवासी संख्या जानेवारी महिन्यात १७ लाख ५५ हजार, फेब्रुवारीत १७ लाख ७६ हजार होती. विस्तारित मार्ग सुरू झाल्यानंतर मार्चमध्ये प्रवासी संख्या २२ लाख ५८ हजारांवर गेली. त्यानंतर प्रवासी संख्येतील वाढ कायम राहून ती एप्रिलमध्ये २३ लाख ८१ हजार आणि मेमध्ये २६ लाख १६ हजारांवर पोहोचली आहे.

मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या जानेवारी महिन्यात सुमारे ६० हजार होती. रामवाडीपर्यंत विस्तारित मार्ग सुरू झाल्यानंतर दैनंदिन प्रवासी संख्या ९० हजारांवर पोहोचली आहे. विस्तारित मार्ग सुरू होण्याआधी मेट्रोचे दैनंदिन उत्पन्न सुमारे १० लाख रुपये होते. आता मेट्रोचे दैनंदिन उत्पन्न १४ लाख रुपयांवर पोहोचले आहे. मे महिन्यात मेट्रोला एकूण ४ कोटी २४ लाख ७६ हजार ४८० रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. सध्या पुणे मेट्रोची सेवा पिंपरी-चिंचवड ते जिल्हा न्यायालय आणि वनाझ ते रामवाडी या दोन मार्गांवर सुरू आहे. वनाझ ते रामवाडी मार्गावरील रुबी हॉल ते रामवाडी हा विस्तारित टप्पा मार्चमध्ये सुरू झाला. त्यावर बंडगार्डन, येरवडा, कल्याणीनगर आणि रामवाडी ही स्थानके आहेत. हा मार्ग ५.५ किलोमीटरचा आहे. याचबरोबर पिंपरी-चिंचवड ते जिल्हा न्यायालय मार्ग पुढे स्वारगेटपर्यंत जाणार आहे. या भूमिगत मार्गाचे काम सुरू असून, तो सप्टेंबर महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. हा मार्ग ३.६४ किलोमीटरचा आहे, अशी माहिती महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी दिली.

### येरवडा स्थानक जुलैमध्ये सुरू होणार

वनाझ ते रामवाडी मेट्रो मार्गावरील येरवडा स्थानकाच्या प्रवेशद्वाराचा एक जीना नगर रस्त्यात येत असल्याने महापालिकेने तो दुसरीकडे हलविण्यास सांगितले होते. त्यानुसार महामेट्रोकडून जीना दुसरीकडे करण्याचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे या मार्गावरील सेवेतून येरवडा स्थानक सध्या वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे स्थानक जुलै महिन्याच्या अखेरीस सुरू होणार आहे. हे स्थानक सुरू झाल्यानंतर प्रवासी संख्येत आणखी वाढ होणार आहे.

### मेट्रो प्रवासी संख्या

| | | |
|---|---|---|
| जानेवारी | – | १७ लाख ५५ हजार |
| फेब्रुवारी | – | १७ लाख ७६ हजार |
| मार्च | – | २२ लाख ५८ हजार |
| एप्रिल | – | २३ लाख ८१ हजार |
| मे | – | २६ लाख १६ हजार |

---

## अगरवाल पिता-पुत्राविरूद्ध आणखी एक गुन्हा

### बांधकाम व्यावसायिकाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याची तक्रार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कल्याणीनगर अपघातप्रकरणी चर्चेत असलेल्या सुरेंद्र अगरवाल आणि विशाल अगरवाल या पिता-पुत्रासह पाच जणांवर बांधकाम व्यावसायिकाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**





कल्याणीनगर अपघात प्रकरणी चर्चेत असलेल्या सुरेंद्र अगरवाल आणि विशाल अगरवाल या पिता-पुत्रासह पाच जणांवर बांधकाम व्यावसायिकाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे अगरवाल पिता-पुत्राच्या अडचणींत आणखी वाढ झाल्याचे सांगितले जात आहे.

सावकारी कर्जाला कंटाळून वडगाव शेरी येथे राहणाऱ्या ४१ वर्षीय बांधकाम व्यावसायिकाने ९ जानेवारी रोजी राहत्या घरी गळफास लावून घेत आत्महत्या केली होती. याप्रकरणी विनय विष्णुपंत काळे याच्यावर जानेवारीत महिन्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, गुन्ह्याच्या तपासात सुरेंद्रकुमार अगरवाल, रामकुमार अगरवाल, विशाल अगरवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी रवी हुडलानी आणि मुकेश झेंडे यांचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांच्यावर भादंवि ३०६, ५०४ आणि ५०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती चंदनगर पोलिसांनी दिली.

शशिकांत दत्तात्रय कातोरे (वय ४१, रा. गार्डेनिया सोसायटी, वडगाव शेरी) असे आत्महत्या केलेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. या प्रकरणी दत्तात्रय साहेबराव कातोरे (वय ६९) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार विनय काळे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### पूर्वमोसमी पाऊस पडण्याचा अंदाज

शशिकांत यांचा 'सद्गुरू इन्फ्रा' या नावाने व्यवसाय होता. त्यांना व्यवसायासाठी बँकेचे कर्ज आवश्यक होते. त्याकरिता ते बँकेच्या शोधात होते. याच काळात काळे आणि शशिकांतची ओळख झाली. 'तुम्ही बँक कर्जाच्या भानगडीत पडू नका. मी तुम्हाला पैसे देतो. तुम्ही मला त्यावर पाच टक्क्यांच्या हिशेबाने परतावा द्या' असे सांगितले. शशिकांत याने काळे यांच्याकडून कर्ज घेतले होते. त्याला ठरल्याप्रमाणे पाच टक्केप्रमाणे वेळोवेळी रोख आणि ऑनलाइन स्वरूपात पैसे दिले. काही महिन्यांपूर्वी शशिकांत यांनी नवीन साइट सुरू करण्यासाठी काळेकडून परताव्याच्या पाच टक्के दराने पुन्हा पैसे घेतले. परंतु, ही साईट चालू झाली नाही. त्यानंतर काळे याने या रकमेवर चक्रवाढ व्याज लावण्यास सुरुवात केली. या सर्व पैशांची मागणी सुरू केली. शशिकांतच्या घरी जाऊन त्यांना 'आम्हाला पैसे दिले नाही तर, तुम्हाला तुरुंगात पाठवतो' अशी धमकी दिली. याला कंटाळून शशिकांत कातोरे यांनी आत्महत्या केली होती. या प्रकरणाचा पुढील तपास चंदननगर पोलीस करत आहेत.

## पिंपरी आणि चिंचवडमधील नेत्यांवर भरवसा टाकणे भोवले

# अन् तेथेच वाघेरेंचा गेम झाला!

### मतदारसंघात वाघेरे 92 हजार 502 मतांनी मागे

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**घाटावरील पिंपरी-चिंचवडकर वाघेरे पिंपरी,चिंचवड आणि मावळ या घाटावरीलच विधानसभा मतदारसंघात मागे राहिले. तेथे ते 97 हजार 437 मतांनी पिछाडीवर पडले. त्यांचे होम ग्राउंड असलेल्या पिंपरीने त्यांना दगा दिला. तर, त्यांचा मोठा विश्वास असलेल्या चिंचवडनेही तो सार्थ ठरवला नाही. या दोन मतदारसंघात वाघेरे 92 हजार 502 मतांनी मागे पडले. तेथेच त्यांचा गेम झाला. त्यांनीच याला दुजोरा दिला. पिंपरी आणि चिंचवडमधील नेत्यावर विश्वास टाकला,पण तेथेच गणित फसले,असे वाघेरेंनी नाराजीने सांगितले. काही बाबतीत कमी पडल्याची कबुली त्यांनी दिली.तर,थेट संपर्क आणि विकास कामामुळे पुन्हा निवडून आलो, असे बारणे म्हणाले.**



बारणेंनी खासदारकीची हॅटट्रिक केली. त्यानंतर आता त्याचे परिणाम 4 महिन्यानंतर होणाऱ्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत काय होणार याचे आडाखे बांधण्यात येऊ लागले आहेत. मात्र,मावळमधील सहाही आमदार महायुतीचे आहेत. त्यामुळे आमदार वाढीसाठी लोकसभेचा विजय उपयोगी पडणार नाही. फक्त विद्यमान आमदारांना पुन्हा तिकिट मागण्यासाठी ताकद, मात्र मिळाली आहे. मात्र, कर्जतचे शिंदे शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या मतदारसंघात बारणे हे 17 हजार 607 मतांनी पिछाडीवर राहिले आहेत.त्यामुळे त्यांना एकनाथ शिंदे पुन्हा तिकिट देतील की नाही,याविषयी शंका आहे.

बारणेंना 74 हजार 765 एवढे घशघशीत लीड दिलेल्या चिंचवडच्या भाजप (BJP) आमदार अश्विनी जगताप यांचा आमदारकीचा दावा प्रबळ झाला आहे.त्यांच्याच पक्षाचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनीही बारणेंना 31 हजार 38 चे लीड दिले असल्याने त्यांच्याही तिकिटाचा मार्ग मोकळा झाला आहे.भाजपच्या तुलनेत अजित पवार राष्ट्रवादी आमदारांच्या मतदारसंघात (पिंपरीचे अण्णा बनसोडे 16 हजार 737 आणि मावळचे सुनिल शेळके 4 हजार 935) कमी मताधिक्य बारणेंना मिळाले आहे. त्यांना भाजप संलग्न अपक्ष आमदार महेश बालदी यांच्या उरणमध्ये 13 हजार 250 चे लीड भेटले आहे.त्यामुळे ते भाजपकडून उमेदवारी मागू शकतात.

### चिंचवडवर जगताप कुटूंबाचा होल्ड कायम

मावळ लोकसभेतून निवडणूक लढवित हॅटट्रिक करीत शिंदे शिवसेनेचे श्रीरंग बारणे 96 हजार 615 मतांच्या लीडने विजयी झाले. त्यांच्या या विजयात घाटावरील भाजपचे आमदार असलेल्या चिंचवड विधानसभा मतदारसंघाचा सिंहाचा वाटा राहिला. त्यामुळेच पुन्हा एकदा मावळचा खासदार हा घाटावरचा झाला.त्याजोडीने महायुतीतील राष्ट्रवादीच्या दोन आमदारांच्या मतदारसंघांनीही बारणेंच्या विजयाला हातभार लावला. दरम्यान, मावळमध्ये सर्वात मोठ्या,तर राज्यात मतदारसंख्येत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चिंचवड विधानसभा मतदारसंघावरील जगताप कुटुंबाचा होल्ड तथा करिष्मा कायमच राहिला नाही,तर तो वाढला असल्याचे लोकसभेच्या मावळच्या निकालातून स्पष्ट झाले.कारण चिंचवडने बारणेंना सर्वाधिक पाऊण लाखाचे (74 हजार 765) मताधिक्य देऊन आपला सिंहाचा वाटा उचलला.त्यातून जगतापांची आगामी विधानसभेला चिंचवडवरील दावेदारी आणखी घट्ट झाली. चिंचवड मतदारसंघाचे पहिल्यापासूनचे आमदार पिंपळेगुरव येथील जगताप कुटुंबातीलच सदस्य आहे. 2009 ला चिंचवड अस्तित्वात आला तेव्हा लक्ष्मण जगताप पहिल्यांदा अपक्ष म्हणून निवडून आले.त्यानंतर 2014 आणि 2019 ला ते पुन्हा आमदार झाले. 3 जानेवारी 2023 रोजी त्यांचे आकस्मिक निधन झाल्यानंतर त्यांच्या पत्नी अश्विनी या 26 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या पोटनिवडणुकीत विजयी झाल्या. त्यांचे दीर शंकर जगताप हे भाजपचे (BJP) पिंपरी-चिंचवडचे अध्यक्ष आहेत. त्यांचाही बारणेंच्या यशात वाटा आहे. बारणेंना सर्वाधिक लीड देऊन चिंचवडमधून शंकर जगतापांनी आगामी विधानसभेची आपलीही चिंचवडवरील दावेदारी बळकट केल्याची चर्चा ऐकायला मिळाली. कारण ते गेल्यावर्षीच्या चिंचवडच्या पोटनिवडणुकीतच इच्छूक होते.

---

## हिंजवडीतील अपघात प्रकरणात सहायक फौजदार निलंबित

### मद्यपान केल्याचे वैद्यकीय तपासणीत उघड

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पोलिसांच्या मोटारीने (व्हॅन) महिलेसह एका दुचाकीला धडक देऊन गंभीर जखमी केल्याप्रकरणी चालक, सहायक फौजदारावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. वैद्यकीय तपासणीत फौजदाराने मद्यपान केल्याचेही निष्पन्न झाले आहे. मंगळवारी (४ जून ) दुपारी अडीचच्या सुमारास बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथील पोलीस चौकीसमोर हा प्रकार घडला होता.**



नागेश भालेराव असे निलंबित सहायक फौजदाराचे नाव आहे. भालेराव हा हिंजवडी पोलीस ठाण्यात नियुक्तीस आहे. या अपघातात शंकुतला पंडित शेळके (रा. म्हाळुंगे) या जखमी झाल्या असून त्यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी मंगळवारी बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे पार पडली. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. बंदोबस्तासाठी जागा दिलेली नसतानाही भालेराव हा बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथील पोलीस चौकीसमोर गेला. मोटारीत बसला असताना गाडीचे इंजिन सुरू होते. भालेराव याचा पाय वेग वाढवण्याच्या पेडलवर (ॲक्सिलेटर) पडला. त्यामुळे वाहनाने समोरून पायी जाणाऱ्या शकुंतला यांच्यासह उभ्या दुचाकींना धडक दिली. यामध्ये शकुंतला यांना गंभीर दुखापत झाली. तसेच, एका तरुणाच्या दुचाकीचे मोठे नुकसान झाले. घटनास्थळी दाखल झालेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना भालेराव यांनी मद्यसेवन केले असल्याचा संशय आला. त्यामुळे भालेराव यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यामध्ये घटनेच्या आधी भालेराव यांनी दारूचे सेवन केल्याचे उघड झाले. भालेराव यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे.

या अपघातप्रकरणी सहायक फौजदार भालेराव यांची वैद्यकीय चाचणी करण्यात आली. यामध्ये त्यांनी दारूचे सेवन केले असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे भालेराव यांच्यावर गुन्हा दाखल करून निलंबन करण्यात आले आहे. त्यांची खात्याअंतर्गत चौकशी देखील सुरू करण्यात आली आहे, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी सांगितले.

### वाकडमध्ये मोटारीच्या धडकेत तरुण जखमी

रस्त्यावर उभ्या असलेल्या तरुणाला भरधाव मोटारीने पाठीमागून जोरात धडक दिल्याने तरुण जखमी झाला. ही घटना वाकड पुलाखाली घडली. सचिन भगवान तांबारे (वय २२, रा. संगम चौक, शास्त्रीनगर, कोथरूड) असे अपघातात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. अनोळखी मोटारचालकावर गुन्हा दाखल झाला आहे. ४ जून रोजी सकाळी पावणेदहाच्या सुमारास तांबारे हे वाकड पुलाखाली उभे होते. या वेळी भरधाव आलेल्या मोटारीने पाठीमागून जोरात धडक दिल्याने तांबारे हे रस्त्यावर पडल्याने जखमी झाले.

### मोटारीच्या धडकेत अभियंता जखमी

भरधाव मोटारीने दुचाकीस्वार अभियंता तरुणाला धडक दिल्याची घटना रविवारी रात्री उशिरा घडली. नेरे-दत्तवाडी रस्त्यावरील एक्झर्बिया गृहनिर्माण सोसायटीत घडलेल्या या अपघातात दुचाकीस्वार तरुण जखमी झाला असून, अपघातानंतर मोटारचालक घटनास्थळावरून पसार झाला आहे. लेखराज हरी फिगडे (वय २७, रा. दत्तवाडी, ता. मुळशी, मूळ – जळगाव) असे जखमी अभियंत्याचे नाव आहे. त्यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखी मोटारचालकावर गुन्हा दाखल झाला आहे. फिगडे हे २ जून रोजी रात्री बाराच्या सुमारास दुचाकीवरून घरी जात होते. एक्झर्बिया सोसायटीत समोरून भरधाव आलेल्या मोटारीने जोरात धडक दिल्याने फिगडे हे रस्त्यावर पडल्याने जखमी झाले. त्यांच्या हात, पायाला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर मोटारचालक घटनास्थळावरून पसार झाला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या आधारे आरोपी मोटारचालकाचा शोध सुरू असल्याचे हिंजवडी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी सांगितले.



## भूमिका

# मतदारांचा विवेक जागा



**स्वतंत्र भारताच्या इतिहासात भारतीय मतदार कायमच शहाणपणाने मतदान करीत आले आहेत. भारतीय मतदाराला गृहित धरलेले आवडत नाही आणि तो त्याची ताकद फारसे न बोलता अचूकपणे वापरत असतो. एकही मतदानोत्तर चाचणी निकालांच्या आसपासही जाऊ शकली नाही, याचेही कारण भारतीय मतदारांचे शहाणपण आणि ते जपून-झाकून ठेवण्याची हुशारी हेच आहे.**

लोकसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे नवे सरकार स्थापन करण्याइतके संख्याबळ असले तरी हा नरेंद्र मोदी या ‘ब्रँड’चा ऐतिहासिक पराभव आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात भारतीय मतदार कायमच शहाणपणाने मतदान करीत आले आहेत. भारतीय मतदाराला गृहित धरलेले आवडत नाही आणि तो त्याची ताकद फारसे न बोलता अचूकपणे वापरत असतो. एकही मतदानोत्तर चाचणी निकालांच्या आसपासही जाऊ शकली नाही, याचेही कारण भारतीय मतदारांचे शहाणपण आणि ते जपून-झाकून ठेवण्याची हुशारी हेच आहे. ही निवडणूक म्हणजे केवळ एक औपचारिकता आहे आणि आपला ‘ईश्वरदत्त’ विजय आधीच झाला आहे; अशा भ्रमात अनेकजण होते. त्यांचे पाय या निकालांनी जमिनीला लागले तर बरे होईल. अनपेक्षित आणि अतर्क्य असे काही घडले नाही तर येणारे सरकार भाजपचे किंवा मोदींचे नसेल. ते एनडीएचे असेल. मंगळवारी सायंकाळी पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी ‘इंडिया’ची बैठक होईल आणि तीत सरकार स्थापनेची शक्यता आहे का, हे आजमावून पाहिले जाईल, असे म्हटले. निकालांचे अंकगणित पाहता काँग्रेस व मित्रपक्ष सरकार स्थापनेचा दावा करतील, असे वाटत नाही. तसे करणे योग्य ठरणार नाही. लागोपाठ दोन निवडणुकांमधील घनघोर पराभवानंतर काँग्रेसने मिळवलेले यश मोलाचे आहे. काँग्रेसकडे आता अधिकृतपणे विरोधी पक्षनेतेपद येईल. रायबरेली आणि वायनाड जिंकलेल्या राहुल गांधी यांनी हे पद घ्यायला हवे आणि संसदेत विरोधकांचा आवाज मजबूत करायला हवा. आता काँग्रेसला नवा तडफदार अध्यक्षही मिळायला हवा.

गेल्या पाच-सात वर्षांमध्ये भाजप वाढत्या वेगाने मोदीकेंद्रित होत गेला. पक्षाची ही विपरीत आत्मगती मोदींनी रोखायला हवी होती. मात्र, झाले ते उलटेच. निर्णयांचे, प्रचाराचे, आकांक्षांचे हे केंद्रीकरण मोदींनी अधिकच वेगवान केले. मोदींची प्रचारसभांमधील सर्व भाषणे केवळ ‘प्रथमपुरुषी एकवचनी’ होऊ लागली. आपल्याइतके सत्तेचे व्याकरण कुणाला समजते, असा तोरा असणाऱ्यांना भाषेच्या व्याकरणात ‘प्रथमपुरुषी अनेकवचन’ही असते, याचा विसर पडला. मतदारांना हेही आवडत नाही. अयोध्येतील राम मंदिराच्या सगळ्या कामाचा झोत मोदींनी कायम स्वत:वर ठेवला. याही मतदारसंघात मतदारांनी भाजपला अस्मान दाखविले आहे. भाजप आणि विशेषकरून मोदी यांना पुन्हा एकदा आत्मपरीक्षणाच्या ध्यानास बसण्यासाठी इतके दुसरे सबळ कारण नसेल. राहुल गांधी यांनी उत्तर प्रदेशातील मतदारांचे खास आभार मानले. काँग्रेसने आपला अहंकार बाजूला ठेवून समाजवादी पक्षाशी आघाडी केल्यामुळे उत्तर प्रदेशात विरोधकांना हे यश मिळाले आहे. ‘इंडिया’ने हे शहाणपण देशभरात दाखविले असते आणि ममता बॅनर्जी तसेच नितीश कुमार यांची साथ लाभली असती तर आज याहून वेगळे निकाल लागले असते. विरोधकांचे ऐक्य असेल आणि थोडेबहुत सामंजस्य दाखविले तर काय होऊ शकते, हे काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना यांच्या महाविकास आघाडीने महाराष्ट्रात दाखवून दिले आहे. ‘इंडिया’ला हे सामंजस्य देशभरात दाखविता आले नाही.

यंदा आजवरच्या इतिहासातील सगळ्यांत हिंस्र आणि सत्यापलापी प्रचार मोहीम देशाने अनुभवली. यात कुणीच मागे नव्हते. हिंस्रपणा केवळ कृतीचा नसतो. शिवराळ भाषा, बेलगाम आरोप, खऱ्याचे खोटे आणि वाट्टेल ते गदळ नेऊन विरोधकांना चिकटविणे.. हे प्रकार सर्व पक्षांच्या नेत्यांनी केले. महाराष्ट्राने यात देशाचे नेतृत्वच केले. इतक्या प्रदूषित मोहिमेत आपले डोके शाबूत ठेवून शांतपणे मतदान करणे, हे सोपे नसते. हा विवेक दाखविणाऱ्या मतदारांचे त्यामुळेच अभिनंदन करायला हवे. या मतदारांनी धक्का दिला असला तरी भाजपला केंद्रातील सत्तेतून दूर केलेले नाही.

## प्रासंगिक »

# शेअर बाजाराची कोलांटउडी

***एक्झिट पोलची भाकीते शेअर बाजारात कोट्यवधींची उलथापालथ घडवून आणू शकतात, हे यंदा प्रथमच दिसले. एक्झिट पोलचे अंदाज किती सपशेल आपटले, याचा अनुभव निकालाच्या दिवशी सर्वांनी घेतला.***

परंतु त्याचबरोबर प्रत्यक्ष निकालांमधील आकडेवारी येताच पुन्हा एकदा शेअर बाजारच्या सेन्सेक्समध्ये सहा हजार बिंदूंची घसरण झाली. नंतर बाजार थोडा सावरून ही घसरण चार हजारांपर्यंत थोपविण्यात यश आले.

तीनशे जागांच्या आत परंतु सरकार स्थापन करण्याइतपत तरी मजल भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी मारू शकेल, हे स्पष्ट झाल्यानंतर बाजार सावरला. तरीही दिवसभरात जवळपास पाच टक्क्यांनी शेअर बाजार कोसळला. चार वर्षांत इतक्या मोठ्या प्रमाणात बाजाराची पडझड प्रथमच दिसली. सेन्सेक्स ७० हजार अंकांवर गेल्यापासून भारतीय शेअर बाजारात आंतरराष्ट्रीय घटनांचे परिणाम इतक्या मोठ्या प्रमाणावर सध्या होत नाहीत.

अवकाशातील कोणत्याही जोडीचे परिभ्रमण केंद्र हे त्या जोडीतील घटकांच्या वस्तुमानावर आणि एकमेकांपासून असलेल्या अंतरावर अवलंबून असते. परिणामी, पृथ्वी आणि सूर्य या जोडीचे परिभ्रमण केंद्र हे सूर्याच्या प्रचंड वस्तुमानामुळे सूर्याच्या केंद्राजवळच येते.

# परिभ्रमण म्हणजे नेमके काय?

सूर्यमालेतील सगळे ग्रह सूर्याभोवती आणि चंद्र पृथ्वीभोवती परिभ्रमण करतो, असे आपण म्हणतो. परंतु वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघता, सूर्य आणि एखादा ग्रह हे दोघे त्यांच्या एकत्रित वस्तुमानाच्या केंद्राभोवती, म्हणजेच परिभ्रमण केंद्राभोवती (बॅरीसेंटर) प्रदक्षिणा करत असतात. या सूत्राच्या आधारे, सूर्य आणि एखादा ग्रह एकमेकांभोवती फिरताना दिसायला हवेत, पण तसे न घडण्यामागचे कारण म्हणजे, सौरमालेतील कुठल्याही ग्रहाचे वस्तुमान सूर्याच्या तुलनेत अगदी नगण्य आहे.

अवकाशातील कोणत्याही जोडीचे परिभ्रमण केंद्र हे त्या जोडीतील घटकांच्या वस्तुमानावर आणि एकमेकांपासून असलेल्या अंतरावर अवलंबून असते. परिणामी, पृथ्वी आणि सूर्य या जोडीचे परिभ्रमण केंद्र हे सूर्याच्या प्रचंड वस्तुमानामुळे सूर्याच्या केंद्राजवळच येते. म्हणून त्या परिभ्रमण केंद्राभोवती फिरत असलेली पृथ्वी आपल्याला सूर्याभोवती परिभ्रमण करताना दिसते,



मात्र सूर्यमालेतील सगळ्यात विशाल असलेल्या गुरू ग्रहापेक्षादेखील सूर्याचे वस्तुमान अनेक पटीने जास्त असले, तरी त्यांच्यातील अंतरदेखील फार जास्त असल्याने त्याचे परिभ्रमण केंद्र हे सूर्याच्या पृष्ठभागापासून जवळजवळ ५० हजार किलोमीटरवर आहे. इतर सगळ्या ग्रहांचे आणि सूर्याचे परिभ्रमण केंद्र हे सूर्याच्या आतच सामावलेले आहे.

चंद्र आणि पृथ्वीच्या वस्तुमानातील तफावत सूर्य-पृथ्वी यांसारखी प्रचंड नसल्याने त्यांच्यातील परिभ्रमण केंद्र पृथ्वीच्या केंद्रापासून साडेचार हजार किलोमीटरवर, म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळ आढळते. परिणामी, चंद्रसुद्धा पृथ्वीभोवती भ्रमण करताना दिसतो. परंतु पृथ्वीदेखील या परिभ्रमण केंद्राभोवती भ्रमण करत असल्याने आणि हे परिभ्रमण केंद्र पृथ्वीच्या आत असल्याने पृथ्वी डगमगल्यासारखी (वॉबल) जाणवते. सूर्याच्या बाबतीत हाच परिणाम अगदी कमी प्रमाणात जाणवतो.

जेव्हा दोन वस्तू समान वस्तुमानाच्या असतात, तेव्हा त्यांचे परिभ्रमण केंद्र बरोबर एकमेकांच्या मध्ये असून त्या एकाच बिंदूभोवती भ्रमण करतात. त्यावेळी ते एकमेकांभोवती फिरताना जाणवतात. अशा प्रकारचे भ्रमण अनेक जोडताऱ्यांमध्ये आणि लघुग्रहांमध्ये दिसून येते. लघुग्रह पट्ट्यातील अँटीओप या जोड लघुग्रहातील दोन्ही लघुग्रह एकमेकांभोवती भ्रमण करतात. तसेच दोन वस्तूंच्या वस्तुमानामधील फरक कमी असला, तर त्यांचे परिभ्रमण केंद्र तुलनेने जास्त वस्तुमानाच्या वस्तूजवळ झुकलेले असते. अशावेळी ते दोघे एकाच बिंदूभोवती भ्रमण करतात, परंतु एकमेकांभोवती भ्रमण करत असल्याचे जाणवत नाही. प्लुटो आणि त्याचा उपग्रह शॅरन अशाप्रकारे भ्रमण करतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोकण पदवीधर मतदारसंघात शिवसेनेमध्ये इच्छुकांची धडपड!

## दोन दिवस शिल्लक अद्याप शिवसेनेने (शिंदे गट) उमेदवार निश्चित नाही

। पनवेल ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कोकण पदवीधर निवडणूकीत नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी दोन दिवस शिल्लक असताना अद्याप शिवसेनेने (शिंदे गट) उमेदवार निश्चित केला नाही. शिवसेनेचे सचिव संजय मोरे हे इच्छुक असताना पनवेलमधील शिवसेनेच्या गटाने मंगेश रानवडे यांच्या नावाची शिफारस केली आहे. त्यामुळे शिवसेनेत ताळमेळ नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.**



कोकण पदवीधर मतदारसंघात मागील निवडणूकीपेक्षा दुप्पटीने मतदारांची संख्या वाढली असून सध्या कोकण पदवीधर मतदारसंघात २ लाख ३ हजार मतदारांची नोंद झाली आहे. रायगड जिल्ह्यात ५३ हजार मतदार असून यापैकी २० हजार मतदार पनवेलमधील आहेत. तसेच ठाणे जिल्ह्यात ९५ हजार मतदार आहेत. यापूर्वीच्या निवडणूकीत निरंजन डावखरे यांना ३२ हजार पदवीधरांनी पसंदी दर्शविल्याने ते या मतदारसंघातून आमदार झाले. मात्र त्यावेळेस एक लाखावर मतदार संख्या होती. सध्या दुप्पटीपेक्षा जास्त मतदार या मतदारसंघात वाढले आहेत. मतदारांप्रमाणे इच्छुक उमेदवारांची संख्या मतदारसंघात मोठी झाली आहे. अद्याप या मतदारसंघात चौरंगी लढत होणार की दुरंगी की तिरंगी हे अद्याप ठरलेले नाही. ७ जून ही या निवडणूकीत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख असली तरी शिवसेनेचा एबी फॉर्म संजय मोरे यांना मिळणार की पनवेलचे इच्छुक असलेल्या मंगेश रानवडे यांना मिळणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### आचारसंहिता संपुष्टात पण...

लोकसभेच्या निवडणूकांसाठी भारत निवडणूक आयोगामार्फत देशभरात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली होती. निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाली असून आदर्श आचारसंहिता संपुष्टात आल्याची माहिती भारत निवडणूक आयोगाने राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत दिलीय. दरम्यान राज्यात मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदार संघासाठी निवडणूक जाहीर झाली आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबई, कोकण आणि नाशिक विभागात आदर्श आचारसंहिता लागू राहणार असल्याचेही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

दोन आठवड्यांपूर्वी कळंबोली येथील सेनेच्या मध्यवर्ती कार्यालयात जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मंगेश रानवडे यांनी कोकण पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी पनवेलचे पदाधिकारी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असा ठराव झाला. मात्र त्यानंतर स्वता ठाणे जिल्ह्यातून मतदारांची संख्या अधिक असल्याने सेनेचे सचिव संजय मोरे यांनी इच्छा व्यक्त केल्याने पनवेलचा इच्छुकांचा दावा मागे घेतील असे चित्र होते. मात्र मंगेश रानवडे यांनी बुधवारी दिलेल्या माहितीनूसार अद्याप कोकण पदवीधर मतदारसंघातून उमेदवारी पक्षाने दिल्यास लढविण्यास इच्छुक असल्याचा दावा केल्याने शिवसेनेत असमन्वय असल्याचे चित्र आहे.

> संविधानाने पदवीधरांना त्यांची बाजू विधिमंडळात मांडता यावी यासाठी हे सदस्य निर्माण केले आहे. ही सर्वात चांगली बाजू आहे. पदवीधरांचे नेतृत्व करणारा खरा चेहरा विधिमंडळात गेल्यास त्याला काम करण्याची संधी मिळेल. पदवीधरांना नेहमी भेडसावणारा कोकणात जाणारा महामार्गाचा विषय, शालेय मुले, शालेय शुल्क, बदलणारी शिक्षण प्रणाली, आरोग्य, वाहतूक, प्रदूषण हे सर्व विषय पदवीधर मतदारसंघातील यापूर्वीच्या सदस्यांनी मांडलेले दिसत नसल्याने मला निवडणूकीत उमेदवार होण्याची संधी मिळावी यासाठी आम्ही पनवेलचे पदाधिका-यांनी वरिष्ठांकडे ही शिफारस केली आहे.
>
> **-मंगेश रानवडे,** उप महानगरप्रमुख, शिवसेना, पनवेल

### अजित पवार गटाची एन्ट्री

मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा चार जागांकरिता निवडणूक होत आहे. निवडणुकीत महायुतीमधील भाजप, मनसेने आपले उमेदवार दिलेत. आता राष्ट्रवादी कॉंग्रेसही या निवडणुकीत आपला उमेदवार उतरवणार आहे.

शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ निवडणुकीवरुन महायुतीत वाद होण्याची शक्यता आहे. अजित पवार गटही मुंबई किंवा कोकण पदवीधर मतदारसंघात आपला उमेदवार उभा करणार आहे. आज राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या आमदार आणि कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मुंबईत भाजपने उमेदवार दिलाय त्यात आता अजित पवार गटदेखील आपला उमेदवार देणार असल्याची चर्चा असल्यानं वाद होण्याची शक्यता आहे. दरम्यान राज्यात, शिक्षक, पदवीधर निवडणुकीसाठी येत्या २६ जून रोजी मतदान होणार आहे. तर १ जुलैला मतमोजणी होणार आहे.

---

# गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी २ हजार कोटींचा निधी द्या

## छत्रपती संभाजीराजे: किल्ले रायगडावर आयोजित शिवराज्याभिषेक उत्साहात

। अलिबाग ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकिल्ले हे राज्याच्या अस्मितेचे प्रतिक आहेत. या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने २ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी छत्रपती संभाजीराजे यांनी केली.**



ते किल्ले रायगडावर आयोजित शिवराज्याभिषेक सोहळ्या दरम्यान बोलत होते. सरकार अनेक ठिकाणी करोडो रुपये खर्च करीत असते. आमदार खासदारही आपल्या मतदार संघात हजारो कोटींची कामे आणतात. मग गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी का निधी उपलब्ध होऊ शकत नाही. राज्यात छत्रपती शिवरायांचे ३५० हून अधिक गडकिल्ले आहेत. या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी २ हजार कोटी सरकारने द्यावेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केली. सत्तेत असलेल्या आणि नसलेल्या सर्वपक्षीय नेत्यांनी यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि कर्तृत्व जगभरात पोहोचण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. यावर्षी अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथे शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात येणार आहे. त्याला तमाम शिवभक्तांच्यावतीने आपल्याला निमंत्रित करण्यात आल्याची माहिती छत्रपती संभाजीराजे यांनी यावेळी दिली. किल्ले रायगडच्या या प्रतिकूल परिस्थितीत लाखोंच्या संख्येने शिवभक्त गडावर येत असतात. मिळेल त्या वाहनाने, सायकलवरुन, काहीजण चालत या शिवराज्याभिषेक सोहोळयाला येतात. इतके प्रेम जगात कोणाला कुठेही पहायला मिळत नाही, हे प्रेम ज्यांनी आपल्यासाठी स्वराज्य स्थापन केले, त्या शिवछत्रपती शिवाजी महाराजांसाठीच पहायला मिळते.

### शिवराज्याभिषेक सोहळ्यास उपस्थित...

या शिवराज्याभिषेक सोहळ्यास युवराज शहाजीराजे, युवराज्ञी संयोगिता राजे, खा.ओमराजे निंबाळकर, आ. रोहित पवार, माजी आ. अनिकेत तटकरे, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील, संत तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज देहूचे प्रशांत महाराज, शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे अध्यक्ष संदीप खांडेकर, माजी अध्यक्ष फत्तेसिंह सावंत, शिवव्याख्याते यशवंत गोसावी, संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड उपस्थित होते.

# खातेवाटपावरुन रस्सीखेच!

## कळीच्या खात्यांसाठी वाटाघाटी; तेलुगु देसम, जेडीयू पक्षांचा भाजपवर दबाव

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मोदी ३.० सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळातील कळीची खाती पदरात पाडून घेण्यासाठी तेलुगु देसम व संयुक्त जनता दल (जेडीयू) या दोन्ही प्रमुख घटक पक्षांच्या भाजपशी शुक्रवारी तीव्र वाटाघाटी सुरू होत्या. तेलुगु देसमने लोकसभाध्यक्ष पदासह माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाची तर जनता दलाने रेल्वे मंत्रालयाची मागणी केल्याचे समजते. कृषि मंत्रालयावर दोन्ही जनता दलांनी दावा केला आहे. भाजपवर घटक पक्षांनी दबाव वाढवला असला तरी, विविध क्षेत्रांतील पायाभूत विकासांची मंत्रालये सोडण्याची भाजपची तयारी नाही. त्यामुळे खातेवाटपाची गुंतागुंत वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



गृह, अर्थ, संरक्षण व परराष्ट्र संबंध ही चार अत्यंत संवेदनशील व महत्त्वाची खाती स्वत:कडे ठेवण्यावर भाजप ठाम असून लोकसभाध्यक्षपदबाबतही तडजोड केली जाणार नसल्याचे समजते. तेलुगु देसमला लोकसभेचे उपाध्यक्षपद दिले जाऊ शकते

गेल्या दहा वर्षांमध्ये मोदी सरकारने पायाभूत विकासाला मोठी चालना दिली असून आगामी काळात आर्थिक विकासाचा वेग वाढवला जाईल. त्यामुळे रस्तेविकास, रेल्वे, बंदरविकास, माहिती-तंत्रज्ञान, वाणिज्य ही खाती घटक पक्षांना देणे परवडणारे नाही. याशिवाय माहिती-प्रसारण, समाजकल्याण, महिला बालकल्याण, क्रीडा व युवा तसेच कृषी व ही खाती लोककल्याणाच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वाची असल्याने त्यावरील दावाही भाजप सोडणार नसल्याचे समजते. या मंत्रिमंडळातील राज्यमंत्रीपदे तेलुगु देसम व जनता दलाला दिली जाऊ शकतील.

नागरी विमान वाहतूक, पंचायत राज, नागरी पुरवठा, लघु उद्योग, अवजड उद्योग, कौशल्य विकास, भूविज्ञान, कामगार कल्याण, विज्ञान-तंत्रज्ञान या मंत्रालयांतील केंद्रीय मंत्रिपदे घटक पक्षांना दिली जातील. शिवसेनेच्या शिंदे गटाची अवजड उद्योग मंत्रालयाची मागणी मान्य केली जाण्याची शक्यता आहे.

तेलुगु देसमने चार, जनता दलाने (सं) तीन केंद्रीय मंत्रीपदाची मागणी केली आहे. चिराग पासवान व शिंदे गटाने एक केंद्रीय मंत्रिपद व एका राज्यमंत्रीपदावर दावा केल्याचे सांगितले जाते. चार खासदारांमागे एक केंद्रीय मंत्रिपद असे खातेवाटपाचे सूत्र निश्चित झाल्याचे सांगितले जाते. अजित पवार गटाचा एकच खासदार जिंकून आला असला तरी प्रफुल पटेल यांना केंद्रीय मंत्रिपद दिले जाऊ शकते. रामदास आठवलेंनाही सामावून घेतले जाऊ शकते. त्यामुळे हे सूत्र लागू होण्याची शक्यता नसल्याचे मानले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घटक पक्षांशी खातेवाटपाच्या चर्चेची जबाबदारी अमित शहा, राजनाथ सिंह व जे. पी. नड्डा यांच्यावर सोपवली आहे. या तिन्ही नेत्यांनी गुरुवारी घटक पक्षांच्या नेत्यांशी संवाद साधला. या प्रक्रियेमध्ये पीयुष गोयल, प्रल्हाद जोशी, तरुण चुग हे नेतेही सहभागी झाले होते.

### घटक पक्षांच्या खात्यांच्या मागण्या

**तेलुगु देसम :** लोकसभाध्यक्ष, रस्तेविकास, पंचायत राज, आरोग्य, माहिती-तंत्रज्ञान व शिक्षण
**संयुक्त जनता दल :** कृषि, रेल्वे, पंचायत राज, ग्रामीण विकास
**जनता दल (धर्मनिरपेक्ष) :** कृषि, पंचायत राज, नागरी पुरवठा, ग्रामीण विकास
**शिवसेना शिंदे :** अवजड उद्योग

# केजरीवाल यांना गंभीर आजार नसल्याचे सिद्ध!

## जामीन नाकारताना न्यायालयाचे निरीक्षण

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी ज्या प्रकारे मोठ्या प्रमाणात प्रचार केला आहे त्यावरून त्यांना कोणत्याही गंभीर किंवा 'जीवघेण्या' आजाराने ग्रासलेले नाही हेच सिद्ध होते, असे सांगत दिल्लीच्या एका न्यायालयाने केजरीवाल यांना अंतरिम जामीन देण्यास नकार दिला आहे.**





दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी ज्या प्रकारे मोठ्या प्रमाणात प्रचार केला आहे त्यावरून त्यांना कोणत्याही गंभीर किंवा 'जीवघेण्या' आजाराने ग्रासलेले नाही हेच सिद्ध होते, असे सांगत दिल्लीच्या एका न्यायालयाने केजरीवाल यांना अंतरिम जामीन देण्यास नकार दिला आहे. केजरीवाल यांना आणखी एक धक्का देताना, कथित मद्य धोरण घोटाळ्याशी संबंधित आर्थिक अफरातफर प्रकरणात आरोग्याच्या कारणास्तव अंतरिम जामीन मागणारा त्यांचा अर्ज न्यायालयाने बुधवारी फेटाळला. विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा म्हणाल्या, 'अरविंद केजरीवाल यांनी केलेला प्रचार आणि संबंधित बैठका आणि कार्यक्रम, चर्चेदरम्यान त्यांनी निदर्शनास आणल्यानुसार, त्यांना कोणत्याही गंभीर किंवा 'जीवघेण्या' आजाराने ग्रासलेले नाही. अशा परिस्थितीत ते लाभासाठी पात्र नाही.' न्यायाधीश बावेजा यांनी केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत १९ जूनपर्यंत वाढ केली. या प्रकरणी वैधानिक जामीन मिळावा, या अर्जावर न्यायालय ७ जून रोजी सुनावणी घेणार आहे.

अर्जदार, कोठडीत असताना, चाचण्या का केल्या जाऊ शकत नाहीत याचे कोणतेही कारण दिसत नाही? अर्जदाराच्या विहित शिफारस केलेल्या चाचण्या/मूल्यमापन कोणत्याही विलंबाशिवाय आयोजित केल्या जातील याची तुरुंग अधिकारी तजवीज करतील, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

### न्यायालयीन कोठडीत 19 जूनपर्यंत वाढ

मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणात गंभीर आरोप झालेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत 19 जूनपर्यंत वाढ झाली आहे. वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामीन दिला जावा, अशी विनंती केजरीवाल यांनी राउज अव्हेन्यू न्यायालयाकडे केली होती. मात्र त्यांना दिलासा देण्यास न्यायालयाने नकार दिला. केजरीवाल यांची वैद्यकीय तपासणी करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

आपले वजन कमी झाले असून कोणता तरी गंभीर आजार झाला असण्याची शक्यता वाटत आहे. त्यामुळे वैद्यकीय चाचण्या करुन घेण्यासाठी आठवडाभराकरिता अंतरिम जामीन दिला जावा, अशी विनंती केजरीवाल यांनी केली होती. सक्तवसुली संचलनालयाने या जामीन अर्जाला विरोध केला होता. केजरीवाल सलग निवडणूक प्रचार करीत होते, मात्र जेव्हा आत्मसमर्पण करण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी वैद्यकीय कारण सांगितले. एकप्रकारे केजरीवाल न्यायालयाची दिशाभूल करीत असल्याने त्यांना जामीन दिला जाउ नये, असा युक्तिवाद ईडीकडून गत आठवड्यात करण्यात आला होता.

उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायमूर्ती कावेरी बावेजा यांनी निकाल राखून ठेवला होता. तो निकाल आज त्यांनी दिला. केजरीवाल यांना सुनावणीदरम्यान आभासी मार्गाने हजर करण्यात आले होते. दरम्यान विशेष न्यायालयाच्या आदेशाला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान देण्याचे संकेत केजरीवाल यांच्या वकिलांनी दिले आहेत. केजरीवाल यांना गत 10 मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम जामीन दिला होता. निवडणुकीत प्रचार करण्यासाठी त्यांना जामीन देत असताना 2 जून रोजी आत्मसमर्पण करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते.

# माधुरी दीक्षितने सांगितला 'पंचक'चा अनुभव



डॉ. श्रीराम नेने आणि माधुरी दीक्षित नेने निर्मित 'पंचक' हा चित्रपट प्रदर्शित व्हायला अवघे काही दिवस असतानाच आता या चित्रपटाचा आणखी एक उत्कंठावर्धक ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. गेल्या काही दिवसांपासून या चित्रपटाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरु आहे. इतकेच नाही तर बॉलिवूडमधील काही नामवंत कलाकारांनी 'पंचक'च्या ट्रेलरचे भरभरून कौतुक केले आहे. नवीन वर्षात प्रदर्शित होणारा हा चित्रपट मल्टीस्टारर आहे. अशातच चित्रपटाचा नवीन ट्रेलर भेटीला आलाय. 'पंचक'च्या पहिल्या ट्रेलरने खूप उत्सुकता निर्माण केली होती. त्यात आता या दुसऱ्या ट्रेलरने अधिक भर टाकली आहे. खोतांच्या घराला पंचक लागल्याने 'आता कोणाचा नंबर ?' हा प्रश्न अवघ्या घराला पडलेला असतानाच, अनेक जण आपापल्या परीने हे संकट टाळण्याचा प्रयत्न करत आहेत. या सगळ्या गोंधळात घरात सर्कस होत आहे, ऑपेराही होताना दिसत आहे. त्यामुळे आता पुढे काय होणार हे, याचे उत्तर प्रेक्षकांना ५ जानेवारी रोजी मिळणार आहे. कथा, दिग्दर्शन, कलाकार, संगीत या सगळ्याच चित्रपटाच्या जमेच्या बाजू आहेत. चित्रपटाबद्दल माधुरी दीक्षित नेने म्हणतात, "या चित्रपटाच्या क्रिएटिव्ह बाबींमध्ये मी विशेष लक्ष घातले आहे. पडद्यावरील आणि पडद्यामागील प्रत्येकाची निवड ही योग्य आहे. चित्रपट पाहताना याचा प्रत्यय प्रेक्षकांनाही नक्कीच येईल. प्रत्येक कलाकार त्या व्यक्तिरेखेत चपखल बसला आहे. चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान थोड्या अडचणी आल्या परंतु आज जेव्हा चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे, तेव्हा मनाला समाधान मिळतेय. मला खात्री आहे, चित्रपटावर प्रेक्षक नक्कीच भरभरून प्रेम करतील."

## अभिनेत्री श्वेता शिंदेच्या घरावर मोठा दरोडा!

अभिनेत्री श्वेता शिंदे अभिनयाबरोबर निर्मितीची धुरा सांभाळणारी श्वेता शिंदे हिच्या घरावर मोठा दरोडा पडल्याचं समोर येत आहे. घटनेच्या वेळी घरात कोणी नसल्यामुळे अभिनेत्रीचं कुटुंब सुखरुप आहे. याप्रकरणी श्वेताने एफआयआर दाखल केला असून पोलीस लवकरच चोरांना शोधून काढतील, असा विश्वास तिनं व्यक्त केला आहे. अभिनेत्री श्वेता शिंदे आपल्या कुटुंबासह साताऱ्यातील पिरवाडी येथे राहते. याच साताऱ्याच्या घरात ३ जूनला चोरांनी मोठा दरोडा टाकला. यावेळी घरात कोणीच नव्हतं. श्वेता देखील कामानिमित्ताने मुंबईत होती. पण चोर हिच वेळ साधत अभिनेत्रीच्या घरात घुसले. त्यांनी कपाटातले दागिने आणि पैशांची चोरी केली. त्यामुळे अभिनेत्रीच्या घराच्या आजूबाजूला खळबळ माजली. आता याप्रकरणी सातारा पोलिसांचा तपास सुरू आहे.

## मुलांवर संस्कार होण्यासाठी



बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयानं नेहमीच चाहत्यांच्या पसंतीची अभिनेत्री राहिलेल्या प्रियंका चोप्रानं हॉलीवूडमध्ये देखील दमदारपणे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हॉलीवूडमध्ये तिच्या चाहत्यांची संख्या मोठी आहे. सध्या विदेशात स्थायिक असणाऱ्या प्रियंकाच्या आईनं कुटूंब पद्धतीवर केलेले भाष्य चर्चेत आले आहे. प्रियंका ही अमेरिकेमध्ये तिचा पती निक जोनास याच्यासोबत राहते आहे.तिला मालती नावाची मुलगी आहे. २०१८ मध्ये तिनं निकसोबत लग्न केले होते. गेल्या काही दिवसांपासून प्रियंका आणि तिचा पती निक हे वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत आले आहे. हॉलीवूडमधील प्रतिष्ठेच्या ऑस्कर सोहळ्यामध्ये सहभागी होण्याची संधी हा दोन्ही सेलिब्रेटींना मिळाली होती. त्याची बॉलीवूडमध्ये चर्चा झाली होती. प्रियंका चोप्राची आई मधू चोप्रा यांनी सध्या एकत्र आणि विभक्त कुटूंब पद्धतीवर केलेलं भाष्य हे नेटकऱ्यांच्या चर्चेत आले आहे. डॉक्टर मधू चोप्रा या सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असणाऱ्या सेलिब्रेटी आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी प्रियंका चोप्राचे लहानपण आणि विभक्त कुटूंब पद्धती, त्याचा मुलांवर होणारा परिणाम, संस्कार यावर मोकळेपणानं प्रतिक्रिया दिली होती.

## चित्रपटांपासून दूर तरीही ऐशोआरामात जगतो गोविंदा

बॉलिवूड अभिनेता गोविंदा त्याच्या दमदार अभिनयासाठी ओळखला जातो. गोविंदा बऱ्याच काळापासून मोठ्या पडद्यापासून दूर आहे. एकेकाळी आपल्या विनोदी भूमिकांनी प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या गोविंदाकडे आता चित्रपट नाहीत. गोविंदाला चित्रपट मिळत नसले तरी तो आलिशान आयुष्य जगतो. गोविंदा स्क्रीनवर दिसत नसला तरी तो वर्षाकाठी कोट्यवधी रुपये कमावतो. चित्रपटांपासून दूर असूनही गोविंदा राजा बाबूसारखं ऐशोआरामाचं आयुष्य कसं जगतोय ते जाणून घेऊयात.

गोविंदाच्या शेवटच्या चित्रपटाबद्दल बोलायचं झाल्यास तो पाच वर्षांपूर्वी मोठ्या पडद्यावर दिसला होता. २०१९ साली आलेल्या 'रंगीला बाबू' चित्रपटात गोविंदाने काम केलं होतं. हा चित्रपट फ्लॉप झाला होता, यानंतर तो कोणत्याही चित्रपटात दिसला नाही.गोविंदाची एकूण संपत्ती १५१ कोटींहून जास्त आहे. गोविंदाचे अनेक बंगले आहेत. प्रत्येक बंगल्याची किंमत कोट्यवधी रुपयांमध्ये आहे. गोविंदा रिॲलिटी शोमध्ये दिसतो, परंतु त्याची मुख्य कमाई ब्रँड एंडोर्समेंट आणि रिअल इस्टेटमधून येते. गोविंदाकडे मर्सिडीज बेंझसारख्या महागड्या कारही आहेत.



# पुन्हा संसार थाटणार मलायका अरोरा !

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री मलायका अरोरा (MALAIKA ARORA) ही तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. मलायका ही गेल्या काही महिन्यांपासून अभिनेता अर्जुन कपूरला (ARJUN KAPOOR) डेट करत आहे. अशातच मलायकाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ज्या व्हिडीओमध्ये मलायका ही अर्जुनसोबत नाही तर दुसऱ्या अभिनेत्यासोबत रोमँटिक डान्स करताना दिसत आहे. मलायका ही झलक दिखला जा या कार्यक्रमाची परीक्षक आहे. काही दिवसांपूर्वी झलक दिखला जा या कार्यक्रमाच्या मंचावर अभिनेता शोएब इब्राहिम आणि मलायका यांचा रोमँटिक अंदाज प्रेक्षकांना बघायला मिळाला. शोएब आणि मलायका यांनी झलक दिखला जा या कार्यक्रमात रोमँटिक गाण्यावर डान्स केला. तसेच शोएबनं मलायकाच्या हातावर किस देखील केलं. दोघांच्या या रोमान्सनं अनेकांचे लक्ष वेधलं. 'झलक दिखला जा 11' या कार्यक्रमामध्ये फराह खाननं मलायकाला विचारलं,"2024 मध्ये तू अभिनेत्री आणि सिंगल पॅरेंट असणार की, अभिनेत्री आणि डबल पॅरेंट असणार?" फराहच्या या प्रश्नाला मलायका उत्तर देते, " त्यासाठी मला पुन्हा कोणालातरी दत्तक घ्यावे लागेल" तर गौहर खान मलायकाला म्हणते,"तू दुसरं लग्न करणार आहेस का?". यावर मलायका म्हणते, "एखादी चांगली व्यक्ती असेल तर नक्कीच मी 100 टक्के लग्न करण्याचा विचार करेल. मला कोणी लग्नसाठी मागणी घातली तर मी पुन्हा संसार थाटेल" 'छैय्या छैय्या', मुन्नी बदनाम हुई डार्लिंग तेरे लिए या गाण्यांमुळे मलायकाला विशेष लोकप्रियता मिळाली.मलायकाने 1998 मध्ये अरबाजसोबत लग्न केले. त्यानंतर 2017 मध्ये मलायका आणि अरबाजचा घटस्फोट झाला. मलायका आणि अरबाज यांना एक मुलगा आहे. त्याचे नाव अरहान खान आहे. काही दिवसांपूर्वी अरबाजनं शूरा खानसोबत लग्न केलं. तर मलायका ही अर्जुनसोबत कधी लग्न करणार? असा प्रश्न तिच्या चाहत्यांना पडला आहे.बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री मलायका अरोरा (MALAIKA ARORA) ही तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. मलायका ही गेल्या काही महिन्यांपासून अभिनेता अर्जुन कपूरला डेट करत आहे.

# बाबरचा संघ पराभूत!

## सुपर ओव्हरमध्ये सामना जिंकून अमेरिकेने इतिहास रचला

न्यूयॉर्क । वृत्तसंस्था

**टी२० विश्वचषक २०२४ मध्ये, पाकिस्तान पहिल्याच सामन्यात सपशेल अपयशी ठरला. यजमान अमेरिकेने पराभूत करून इतिहास रचला. डॅलस येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात, अमेरिकेने सुपर ओव्हरमध्ये पाकिस्तानला पराभूत करून आपला पहिला T20 विश्वचषक खेळणाऱ्या अमेरिकेने प्रथम पाकिस्तानला फक्त १६० धावांवर रोखलं आणि नंतर शेवटच्या चेंडूवर चौकार मारून सामना बरोबरीत आणला. यानंतर त्याने सुपर ओव्हरमध्ये पाकिस्तानला १९ धावाही करू दिल्या नाहीत आणि सामना जिंकून त्याने आपल्या क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठा विजय नोंदवला.**




टी२० विश्वचषकात अमेरिकेने अ गटातील सामन्यात २००९ च्या चॅम्पियन पाकिस्तानचा सुपर ओव्हरमध्ये पराभव केला आहे. टेक्सासमधील डॅलस येथील ग्रँड प्रायरी स्टेडियमवर हा सामना खेळला गेला. नाणेफेक हारून प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने २० षटकांत सात गडी गमावून १५९ धावा केल्या होत्या. त्यानंतर अमेरिकेचा संघ २० षटकांत १५९ धावा करू शकला. यानंतर सामना सुपर ओव्हरमध्ये पोहोचला. सुपर ओव्हरमध्ये प्रथम फलंदाजी करणाऱ्या अमेरिकेने १८ धावा केल्या. तर पाकिस्तानचा संघ ६ चेंडूत केवळ १३ धावा करू शकला. आयसीसी टी-२० वर्ल्ड कप २०२४ चा ११ वा सामना डॅलस इथे अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यात खेळला गेला. अमेरिकेचा कर्णधार मोनांक पटेलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. २० षटकात पाकिस्तानला ७ विकेटमध्ये १५९ धावांपर्यंतच मजल मारता आली. पाकिस्तानकडून कर्णधार बाबर आझमने सर्वाधिक ४४ धावा केल्या. तर शादाब खानने ४० धावांची खेळी केली. प्रथम फलंदाजीला आलेल्या पाकिस्तान संघाची सुरुवात खराब झाली. संघाने २६ धावांत तीन विकेट गमावल्या होत्या. हा सामना जिंकण्यासाठी अमेरिकेला १६० धावांचं लक्ष्य होतं. यंदाच्या २०२४ च्या वर्ल्ड कपमधील हा पाकिस्तानचा पहिलाच सामना होता. त्यात त्यांना अमेरिकेविरुद्ध पराभव पत्करावा लागला. या विजयासह अमेरिकेचा संघ अ गटात अव्वल स्थानी पोहोचला आहे. तर भारत एका सामन्यानंतर दोन गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. ९ जून रोजी पाकिस्तानचा पुढील सामना भारताविरुद्ध होणार आहे. तर अमेरिकेचा संघ १२ जूनला भारताशी भिडणार आहे.

### पाकिस्तानला अमेरिकेने झुंजवले

पाकिस्तानला पहिल्याच सामन्यात अमेरिकेने चांगलेच झुंजवले. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमवर तर पहिल्यात सामन्याच मोठी नामुष्की ओढवली. त्यामुळे पहिल्याच सामन्यात पाकिस्तानचा संघ किती पाण्यात आहे हे पाहायला मिळाले. पाकस्तानची पहिली विकेट काढली ती मुंबईकर सौरभ नेत्रावळकरने. सौरभने यावेळी मोहम्मद रिझवानला ९ धावांवर बाद केले आणि पाकिस्तानला धक्का दिला. त्यानंतरच्या तीन षटकांत पाकिस्तानने आपल्या दोन विकेट्स गमावल्या आणि त्यामुळेच त्यांची ३ बाद २६ अशी दयनीय अवस्था झाली होती. पण यावेळी बाबर आझम आणि शादाब खान यांनी पाकिस्तानचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. शादाब यावेळी टी-२० स्टाइलने फटकेबाजी करत होता. पण बाबर मात्र यावेळी टी-२० सामन्यात कसोटी क्रिकेट खेळत असल्याचे पाहायला मिळाले. शादाब खानने यावेळी २५ चेंडूंत १ चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ४० धावा साकारल्या. यावेळी शादाबचा स्ट्राइक रेट होता तो १६०.००. बाबरने यावेळी शादाबपेक्षा चार धावा जास्त केला. पण या ४४ धावा करण्यासाठी बाबर आझमने तब्बल ४३ चेंडू घेतले. ज्यामध्ये ३ चौकार दोन षटकारांचा समावेश होता.

# खेळपट्टीबाबत अंदाज बांधणे अवघड!

## रोहित शर्मा; माजी क्रिकेटपटूंकडूनही टीका

।न्यूयॉर्क
।वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेत ट्रेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार हे निश्चित झाल्यापासून तेथील 'ड्रॉप इन' खेळपट्ट्यांबाबत बरीच चर्चा रंगत होती. आता या स्पर्धेला सुरुवात होऊन तीन-चार दिवस झाले असले, तरी अमेरिकेतील खेळपट्ट्यांबाबत संभ्रम कायम आहे. या खेळपट्ट्यांचा अंदाज बांधणे अवघड असल्याचे मत भारताचा कर्णधार रोहित शर्मने आर्यलडविरुद्धच्या सामन्यानंतर व्यक्त केले. तसेच इरफान पठाण, वसीम जाफर आणि मायकल वॉन यांसारख्या माजी क्रिकेटपटूंकडूनही न्यूयॉर्क येथील खेळपट्टीवर टीका करण्यात आली.**



भारतीय संघाने ट्रेन्टी-२० विश्वचषकातील आपल्या मोहिमेची यशस्वी सुरुवात करताना आर्यलडवर आठ गडी राखून मात केली. मात्र, या सामन्यापेक्षा, त्यात वापरण्यात आलेल्या खेळपट्टीबाबत अधिक चर्चा रंगली. अतिरिक्त उसळी आणि बऱ्याच भेगा असलेल्या या खेळपट्टीवर फलंदाजी करणे अत्यंत अवघड होते. फलंदाजीदरम्यान रोहितच्या खांद्याला चेंडू लागला आणि त्याला मैदानाबाहेर जावे लागले. तसेच ऋषभ पंतच्याही कोपराला चेंडू लागला. या अवघड खेळपट्टीवर आर्यलडच्या फलंदाजांचा भारतीय वेगवान गोलंदाजांसमोर निभाव लागला नाही. आर्यलडचा डाव १६ षटकांत अवघ्या ९६ धावांत संपुष्टात आला. त्यानंतर भारताला विजयी लक्ष्य गाठण्यासाठी १२.२ षटके खेळावी लागली. या सामन्यानंतर न्यूयॉर्कच्या नसाऊ कौंटी स्टेडियममध्ये वापरण्यात आलेल्या खेळपट्टीबाबतचे मत विचारले असता रोहित म्हणाला, "खेळपट्टीचा अंदाज बांधणे अवघड आहे असे मी नाणेफेकीच्या वेळीही सांगितले होते. आम्हाला 'ड्रॉप इन' खेळपट्टीवर खेळण्याचा फारसा अनुभव नाही. येथील खेळपट्ट्या साधारण पाच महिन्यांपूर्वीच तयार करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारच्या खेळपट्टीकडून नक्की काय अपेक्षा करायच्या आणि त्यावर कसे खेळायचे याबाबत संभ्रम आहे."

तसेच या सामन्यादरम्यान समालोचन करणाऱ्या पठाणने न्यूयॉर्क येथील खेळपट्टीवर टीका केली. "अमेरिकेत क्रिकेटचा प्रसार व्हावा अशी सर्वांचीच इच्छा आहे. मात्र, ही खेळपट्टी खेळाडूंसाठी सुरक्षित नाही. अशा प्रकारची खेळपट्टी भारतात वापरली गेली असती, तर पुन्हा त्या केंद्रावर बराच काळ सामना झाला नसता. ही एखादी द्विदेशीय मालिका नसून ट्रेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा आहे. इतक्या मोठ्या स्पर्धेत अशा प्रकारची खेळपट्टी वापरली जाणे अजिबातच योग्य नाही," असे स्पष्ट मत पठाणने व्यक्त केले. भारताचा माजी सलामीवीर वसीम जाफरनेही आपल्या वेगळ्या शैलीत खेळपट्टीवर भाष्य केले. "अमेरिकेतील प्रेक्षकांमध्ये ट्रेन्टी-२०च्या माध्यमातून कसोटी क्रिकेटची गोडी निर्माण करण्याचा विचार असल्यास न्यूयॉर्क येथे वापरण्यात आलेली खेळपट्टी अतिशय उत्कृष्ट आहे असे म्हणू शकतो," अशी उपरोधिक टीका जाफरने केली.

आता याच मैदानावर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील बहुचर्चित सामना ९ जूनला रंगणार आहे. अमेरिकेत क्रिकेटच्या प्रसारासाठी हा सामना अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, खेळपट्टीच्या स्वरूपामुळे या सामन्याची मजा कमी होण्याची भीती क्रिकेट जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

### ऑस्ट्रेलियातून खेळपट्ट्या..

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) ऑस्ट्रेलियात तयार करण्यात आलेल्या १० 'ड्रॉप इन' खेळपट्ट्या मे महिन्याच्या सुरुवातीला न्यूयॉर्कमध्ये आणल्या. यातील चार खेळपट्ट्या सामन्यांसाठी, तर सहा खेळपट्ट्या सरावासाठी तयार करण्यात आल्या आहेत. ऑस्ट्रेलियातील ॲडलेड ओव्हल मैदानाचे खेळपट्टी देखरेखकार (क्युरेटर) डेमियन हॉग यांनी या खेळपट्ट्या तयार केल्या आहेत.